**ठळक बातम्या**

- अनिवासी भारतीयांसाठीच्या ओवरसीझ सिटीझन ऑफ इंडिया - ओसीआय संकेतस्थळाचं उद्धाटन

- देशभरातल्या कृषी विद्यापीठ आणि कृषी संशोधन संस्थेचे कुलगुरू आणि संचालकांची वार्षिक बैठक आज नवी दिल्लीत होणार

- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी घेतली मंत्रिपदाची शपथ

- ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ जयंत नारळीकर कालवश

**आणि**

- अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉक्टर श्रीनिवासन यांचं निधन

**<><><><><>**

गृहमंत्री अमित शहा यांनी काल अनिवासी भारतीयांच्या सेवेसाठी तयार करण्यात आलेल्या नव्या पोर्टलचं उद्धघाटन केलं. यावेळी ते म्हणाले की, हे पोर्टल परदेशात राहणाऱ्या ५ कोटी भारतीयांना आधुनिक सुरक्षा तसंच सुविधा पुरवणार आहे. या पोर्टलचा लाभ ओसीआय कार्डधारक आणि नव्या वापरकर्त्यांना होणार आहे. या पोर्टलच्या माध्यमातून अनिवासी भारतीयांना आणि ओसिआय कार्डधारकांना चांगली सेवा पुरवली जाईल. या पोर्टलद्वारे नोंदणी करणंही अधिक सोयीस्कर होणार आहे. सध्याचं ओसीआय पोर्टल २०१३ साली तयार करण्यात आलं होतं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या पोर्टलचं कौतुक केलं आहे.  या पोर्टलमुळे नागरिकांच्या सेवेसाठी डिजिटल प्रशासनाचा हेतू साध्य होणार असल्याचं त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारतातर्फे सर्वपक्षीय संसद सदस्यांची शिष्टमंडळं विविध देशांना भेट देऊन देशाची बाजू मांडणार आहेत. या पार्श्वभूमीवर परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी आज संसदेत संसद सदस्यांना ऑपरेशन सिंदूर संदर्भात माहिती देणार आहेत. असे सात शिष्टमंडळं विविध देशात जाणार आहेत. या दौऱ्यात शिष्टमंडळाचे सदस्य पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद आणि भारताने राबवलेले ऑपरेशन सिंदूर विषयी माहिती देणार आहेत. आपल्या या दौऱ्यात ही शिष्टमंडळं संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीच्या सदस्य देशांनाही भेटणार आहेत.

**<><><><><>**

सीमा सुरक्षा दलाच्या पंजबामधल्या तीन सीमा चौक्यांवर बिटींग रिट्रीट समारंभ आजपासून पुन्हा सुरू होत आहे. आजचा समारंभ केवळ प्रसारमाध्यमांसाठी असून उद्यापासून सर्वसामान्य नागरिकांसाठी खुला करण्यात येणार आहे. हा बिटींग रिट्रीट समारंभ पंजाबमधल्या अटारी, हुसैनीवावा आणि सादकी या सीमा चौक्यांवर होणार आहे. ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाल्याच्या दुसऱ्या दिवशी बिटींग रिट्रीट समारंभ स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

**<><><><><>**

भारत- अमोरिका  द्विपक्षीय व्यापार कराराच्या पहिल्या टप्प्याच्या चर्चा फलदायी होत असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी आज सांगितलं. या द्विपक्षीय कराराच्या बाकी मुद्यांवर सहमती झाली असल्यामुळे २०२५ या वर्षअखेरी आधी कराराला अंतिम रुप देण्यासाठी आयातशुल्क कमी करण्याबाबत दोन्ही देशांमध्ये चर्चा सुरु आहे.  याबद्दल सहमती झाली की दोन्ही देशांमधला व्यापार वाढेल, अशी खात्री गोयल यांनी व्यक्त केली.

भारताच्या वाढत्या विकासदराकडे बघता येत्या २५-३० वर्षात तरुणांकडून वस्तू तसंच सेवांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढेल. अशा वेळी अमेरिकेबरोबरचा व्यापारसौदा फायदेशीर ठरेल, असा विश्वास त्यांनी वार्ताहरांशी बोलताना व्यक्त केला.

<><><><>

देशभरातल्या कृषी विद्यापीठ आणि कृषी संशोधन संस्थेचे कुलगुरू आणि संचालकांची वार्षिक बैठक आज नवी दिल्लीत होत आहे. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते या परिषदेचं उद्धाटन होणार आहे. कृषी क्षेत्रातील संशोधन, शिक्षण आणि २०४७ मधील विकसित भारत अशी या परिषदेची मध्यवर्ती संकल्पना आहे. परिषदेत कृषी क्षेत्रातले प्रमुख धोरणकर्ते, विचारवंत आणि शैक्षणिक तज्ज्ञ एकत्र येतील आणि देशभरातील शेती क्षेत्रात नवसंकल्पना राबवून नवोपक्रम परिसंस्थेला बळकटी देण्यासाठी आवश्यक असलेल्या धोरणात्मक सुधारणांवर चर्चा केली जाईल, अशी माहिती कृषी मंत्रालयाने एका निवेदनात दिली आहे.

<><><><>

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आजपासून तीन दिवसांच्या गोवा दौऱ्यावर जात आहेत. या भेटी दरम्यान, उद्या ते मोरमुगाव बंदरावर उभारण्यात आलेल्या प्रकल्पांचं लोकार्पण करतील. तसंच बंदरावरील वरिष्ठ अधिकारी, कर्मचाऱ्यांशी संवाद साधतील. गुरुवारी, उपराष्ट्रपती कृषी संशोधन केंद्राला भेट देतील. तसंच राजभवन इथं उभारण्यात आलेल्या आयुर्वेदतज्ज्ञ चरक आणि सुश्रुत यांच्या पुतळ्यांचं अनावरण करणार आहेत.

<><><><>

पाकिस्ताननं त्यांच्या देशातल्या अफगाणी नागरिकांना परत पाठवायला सुरुवात केली असून भारतानं या कुटुंबांना मानवीय दृष्टीकोनातून मदत पाठवली आहे. पाकिस्ताननं पाच हजार अफगाणी कुटुंबांना परत पाठवलं होतं. भारतानं या कुटुंबांना ११ प्रकारची अन्न पाकिटं पुरवली आहेत. काबुलच्या स्थलांतरीत निदेशालयातर्फे या मदतीचं वाटप करण्यात आलं. या मदतीबद्दल अफगाणीस्ताननं भारताचे आभार मानले असून इतर देशांनाही मदत करण्याचं आवाहन केलं आहे.

**<><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते छगन भुजबळ यांनी आज मंत्रिपदाची शपथ घेतली. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी त्यांना पदाची शपथ दिली. मुंबईत राजभवन इथं झालेल्या या सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे उपस्थित होते. अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर राज्याच्या मंत्रिमंडळात मोठा ओबीसी नेता असावा यासाठी भुजबळ यांचा शपथविधी झाल्याचं सांगितलं जात आहे. त्यांच्याकडे अन्न आणि नागरी पुरवठा खात्याचाच पदभार दिला जाईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

**<><><><>**

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ आणि विज्ञान साहित्यिक जयंत नारळीकर यांचं आज पहाटे पुण्यात त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. ते ८६ वर्षांचे होते. त्यांना भारत सरकारने पद्मभूषण तसंच पद्मविभूषण या पुरस्कारांनी गौरवलं होतं. ब्रिटनमधल्या केंब्रिज इथून डॉक्टरेट आणि रँग्लर या प्रतिष्ठित पदव्या घेतल्यानंतर त्यांनी १९७२ मध्ये मुंबईत टाटा मूलभूत संशोधन संस्थेत खगोलशास्त्र विभाग प्रमुखपदाची जबाबदारी स्वीकारली. फ्रेड हॉयल यांच्यासह त्यांनी मांडलेला हॉयल-नारळीकर सिद्धांत प्रसिद्ध आहे. पुण्यात आयुका या संस्थेच्या स्थापनेत त्यांचा प्रमुख सहभाग होता. मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुजवण्यासाठी ‘पोस्टकार्डावरील विज्ञान’ सारख्या अभिनव कल्पना राबवल्या.

विज्ञानकथांबरोबरच विज्ञानावरील विपुल लिखाण त्यांनी केले. त्यांच्या आत्मचरित्राला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला होता.

'भारतात खगोलशास्त्राचा भक्कम पाया घालण्यात नारळीकर यांनी अमूल्य योगदान दिलं, आंतरराष्ट्रीय स्तरावर खगोलीय संशोधनात मोलाची भर घातली', अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी नारळीकर यांना आदरांजली वाहिली. 'नारळीकर यांच्या निधनाने ज्ञान-विज्ञानाच्या प्रसारासाठी वाहून घेतलेला तेजस्वी तारा निखळला आहे', अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नारळीकर यांना आदरांजली वाहिली आहे. 'नारळीकरांचं निधन ही राज्याची आणि देशाची मोठी हानी आहे', अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नारळीकरांना आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

प्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ आणि अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉक्टर एम आर श्रीनिवासन यांचं आज तामिळनाडूमधे निधन झालं. ते ९५ वर्षांचे होते. डॉक्टर श्रीनिवासन यांना भारताच्या नागरी अणुऊर्जा कार्यक्रमाचे शिल्पकार म्हणून ओळखलं जातं. अणुऊर्जा विभागात सप्टेंबर १९५५ ला त्यांनी आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. भारताची पहिली अणुभट्टी अप्सरा च्या निर्मितीत डॉक्टर होमी भाभा यांच्यासोबत श्रीनिवासन यांचा सहभाग होता. १९५९ ला देशातल्या पहिल्या अणुऊर्जा केंद्रासाठी मुख्य प्रकल्प अधिकारी म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. श्रीनिवासन यांच्या नेतृत्वाखाली भारताच्या अणुऊर्जा क्षेत्राच्या पायाभूत सुविधांमधे झपाट्याने वाढ झाली. देशातल्या महत्त्वाच्या ऊर्जा प्रकल्पांच्या निर्मितीत त्यांचं मोठं योगदान होतं. श्रीनिवासन यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना पद्मविभूषण पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशात आणि राज्यात विविध ठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत. पंजाबमधल्या अमृतसर इथं आज भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते तरुण चुग यांच्या नेतृत्वात तिरंगा यात्रा काढण्यात आली. या यात्रेत देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या आणि राष्ट्रगीत गायन करण्यात आलं. देशाच्या एकतेचं प्रतीक म्हणून १०० फूट लांबीचा तिरंगा घेऊन समाजातल्या सर्व स्तरातले नागरिक या रॅलीत सहभागी झाले होते. **महाराष्ट्रात नांदेडमध्ये** काल तिरंगा यात्रा काढण्यात आली. शहरातल्या आयटीआय मार्गावरच्या तिरंगा ध्वजापासून निघालेल्या या तिरंगा रॅलीची सांगता छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ करण्यात आली.

नांदेड जिल्ह्यातल्या माजी सैनिकांनी दिलेल्या प्रतिक्रिया ऐकू या…

**होल्ड…. बाईट**

**//<><><><><>//**